# फुंकर

भावनांचे तरंग उठविते, मनाच्या तरल पटलावर ।
अशी असते ती नाजुक हळुवार फुंकर ....॥धृ॥
फुंकर मारताच मातेने, बाळाच्या कोवळ्या जावळावर ।
भुरु भुरु उडून कसे, पुन्हा येती भाळावर ॥
जीव ओवाळून टाकावा त्याच्या, खुदु खुदु हसण्यावर ।
अशी असते ती नाजुक ........ ॥१॥
अक्षरे गिरविती व मिटविती ही पुन्हा पुन्हा ।
ओल्या चिंब पाटीला मात्र सुकविती पुन्हा पुन्हा ॥
किती विश्वास असतो त्याचा, नुसते फू फू करण्यावर.
अशी असते ती ........ ॥२॥
डोळ्यातील धुळ अलगद फुंकरीने बाहेर यावी ।
थंडगार झुळूकीने, हळूच पापणी मिटावी ॥
जशी लाजरीची पान मिटली, दुरूनच स्पर्श झाल्यावर.
अशी असते ती ........ ॥3॥
~~दुःखावर मात करते, शब्दांच्या फु~~
दुःखावर फुंकर घालते, प्रेमळ शब्दांची माया ।
आपुलकीने पुलकीत होते, आश्वस्त होते काया ॥
खंबीर होते मन, विश्वास बसतो जीवनावर ।
अशी असते ती ........ ॥4॥
फुंकर घालताच, चूल लागते धुमसायला ।
आगीच्या ज्वाळा पुन्हा लागतात फुलायला ॥
मिळते भाकरी पोटाला, तृप्ती देई ढेकर.
अशी असते ती ........ ॥5॥
बासरीच्या मुखरंध्राजवळ तो सावळा कान्हा ।
फुंकर घालतो, जीव ओततो, घेतो तानावर ताना ॥
तल्लीन होऊन डोलते, सारी सृष्टी, सारे चराचर,
अशी असते ती, नाजुक हळुवार फुंकर ........ ॥6॥